# वाणिज्य मंडळ

# २०१५-१६



# वार्षिककार्यक्रम

| अ.क्र. | दिनांक | कार्यक्रम | व्याख्याते |
|---|---|---|---|
| १ | ०६/०७/२०१५ | सेवा क्षेत्रातकरिअर | श्री. हितेशकुमार |
| २ | १०/०८/२०१५ | स्पर्धापरिक्षामार्गदर्शन | सौ. मिनल ओक |
| ३ | १८/११/२०१५ | ग्राहकजागृकता व वित्तीय साक्षरता | श्री. त्रिलोकमिश्रा व<br>सौ. प्रणालीकांबळी |
| ४ | १९/११/२०१५ | करिअर इन एम.बी.ए. | सौ. अनघागोखले |

# सेवा क्षेत्रातकरिअर - हितेशकुमार

दि.६जुलै २०१५रोजीसेवा क्षेत्रातील करिअर या विषयीमाहिती देण्यासाठी सिंडिकेटबँकेचेअधिकारीश्री. हितेशकुमार व त्यांचेसोबत श्री. अरविंदकुमारउपस्थितहोते. या दोघांचेहीस्वागतगुलाबपुष्प देऊन प्राचार्यश्री. सुभाष खोत यांनीकेले. २०२० पर्यंत बँकिग क्षेत्रातकरिअर करण्याची मोठीसंधीमहाविद्यालयीन विद्यार्थ्यांना उपलब्धहोणार असल्याचे प्रतिपादनश्री. हितेशकुमार यांनी केले. त्याचबरोबर महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग, केंद्रिय लोकसेवा आयोग, रेल्वे, विमा, स्टॉफसिलेक्शन, युनायटेड इंडियन इन्सुरंस इ. क्षेत्रातकिती व कशाप्रकारच्या नोकरीच्या मोठ्याप्रमाणावरसंधी उपलब्धआहेत याची योग्यप्रकारे माहितीदिली. तसेच २०२० पर्यंत मोठ्याप्रमाणावर पदे भरलीजाणारअसून त्याची तयारी महाविद्यालयाच्या पहिल्या वर्षापासूनचकरावीअसे त्यांनी आवाहनकेले. त्यांचा असणारा अभ्यासक्रम व अभ्यासक्रमातील घटक, त्यांची तयारी तसेचपरिक्षांचेअर्ज, त्याची मुदत, असणारेवेतन व इतर मिळणाऱ्या सुविधा यासाठी आवश्यक असणारी वयोमर्यादा, परिक्षेचाकालावधी या विषयी माहितीदेतबँकपरिक्षाघेणारी आय.बी.पी.एस. संस्था, त्याची वेबसाईट, बँकेच्या परिक्षेची तयारी करण्याचे तंत्र याविषयी माहितीदिली. तसेच विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांची त्यांनी उत्तरेदिली. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. लंकेश गजभिये यांनी केले.



# विद्यार्थ्यांनी स्पर्धापरिक्षेकडे वळावे -सौ.मिनल ओक

दि.१०ऑगष्ट २०१५रोजीपाटपन्हाळेकला, वाणिज्य व विज्ञानमहाविद्यालयाच्या वाणिज्य मंडळाच्या वतीने आयोजित C.A., I.C.W.A.व इतर स्पर्धापरिक्षांची तयारी व करिअर या विषयावर ओक अकॅडेमीच्या प्रमुखसौ. मिनल ओक यांनी मार्गदर्शनकेले.आपल्या मार्गदर्शनामध्ये सौ. ओक यांनी C.A., I.C.W.A., CS, SET, NET, MPSC, UPSC या परिक्षांची तयारीमहाविद्यालयीनजिवनापासूनचअशीकरावी, जेणेकरूनपदवी मिळाल्यानंतर नोकरीच्या मागे धावावे लागणारनाही,तरनोकरी आपल्या मागे चालून येईल. या सर्वपरिक्षांचीपुर्व, मुख्य व मुलाखत या घटकांचीमाहितीदेऊनमहाविद्यालयात प्रथम वर्षापासूनच यांची तयारी करावीकीजेणेकरूनसर्व तयारी व्यवस्थित होईल. वाणिज्य शाखेतप्रवेशघेतांनाच आपलीदिशानिश्चित करायला हवी. C.A., I.C.W.A., CS यापरिक्षांची तयारी करण्यासाठी बुध्दिमत्तेबरोबरचमानसिक व शारिरीत तयारी देखील महत्वाची आहे.या परिक्षांचानिकाल खुपकमीअसतो, परंतु नियोजनपुर्वक तयारी केल्यास या परिक्षादेखील कठीणनराहता सोप्या होतात.बँकिगपरिक्षाही वाणिज्य शाखेचीमक्तेदारी असायला हवी, परंतूदुर्दैवानेतसेहोतनाहीहीखंत त्यांनी बोलूनदाखविली. मार्गदर्शनकरतांना त्यांनी त्यांच्या आयुष्यातील संघर्षस्पष्ट केला. तसेच या परिक्षांसंदर्भात आवश्यक तेमार्गदर्शन करण्याची तयारीही त्यांनी दाखविली. या परिक्षांची तयारी करतांना व्यक्तिमत्व विकासाकडेहीजाणीवपुर्वकविद्यार्थ्यांनी लक्ष द्यावे व त्यासाठी कोणत्या गोष्टींची तयारी करावीहेदेखील सांगितले. यासाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील वाचनालय व प्राध्यापक मंडळींचा योग्य वापरकरावाअसेआवाहनकेले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्यसुभाष खोत, प्रा. लंकेश गजभिये, प्रा. संजिवमोरे, वाणिज्य मंडळ अध्यक्ष शहारूख चौगले व सर्वपदाधिकारीउपस्थितहोते. सदर कार्यक्रमाची प्रस्तावना व सुत्रसंचालन वृंदालीजाधव व आभारप्रदर्शनसिध्दीसुर्वेहिनेकेले.



# ग्राहकजागरुकता व वित्तीय साक्षरता

## मा. त्रिलोकमिश्रा व सौ. प्रणालीकांबळी

दि. १८/११/२०१५ रोजी वाणिज्य मंडळातर्फेमहाविद्यालयामध्ये वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना वित्तीय आर्थिकसाक्षरता यावी, होणारीआर्थिकफसवणूकटळावी, भाग बाजारामध्ये गुंतवणूककशीकरावी, त्यामध्ये असलेले धोकेकोणते, काळजीकशाप्रकारे घ्यावी यांसदर्भात राष्ट्रीय भागबाजाराचेमा. त्रिलोकमिश्रा यांनी सविस्तरमार्गदर्शनकेले. याचबरोबर ग्राहकम्हणूनग्राहकांचेअसणारेहक्क, त्याचा कायदा, कायद्यातील तरतुदी, ग्राहकांचीहोणारीफसवणूक, फसवणूकीचीवेगवेगळीतंत्रे यासंदर्भात ग्राहकांनीकशीकाळजी घ्यावी यासंबंधी मुंबईग्राहक मंचाच्या सदस्या सौ. प्रणालीकांबळी यांनी मार्गदर्शनकेले. सदर कार्यक्रमाला वाणिज्य शाखेचेसर्वविद्यार्थी व प्राध्यापक उपस्थितहोते.





# डिजिटल व्यवस्थापनामध्ये करिअरचीसंधीमोठयाप्रमाणात उपलब्ध- डॉ अनघा गोखले

सध्याच्यास्पर्धात्मकयुगामध्ये डिजिटल व्यवस्थापनामध्ये करिअरचीसंधीमोठयाप्रमाणात उपलब्ध असूनवाणिज्यशाखेतीलविदयार्थ्यानीया क्षेत्राकडे लक्षदेवून आपले करिअर चांगले घडवावे असे आवाहनडि बी जे महाविदयालयाच्याडिजिटल एम बी अे याविभागाच्याडायरेक्टर डॉ अनघा गोखले यानी केले. गुरूवारदि १९-११-२०१५ रोजी पाटपन्हाळे महाविदयालयाच्यावाणिज्यमंडळातर्फे करिअरइन एम बी अे याविषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविकप्रथमवर्षवाणिज्यशाखेतीतविदयार्थ्यानी कु.**सिध्दीसुर्वे**हिने केले.आपल्यामार्गदर्शनामध्ये सौ गोखले यांनी एम बी अे ची गरजनेमकी का आहे हे स्पष्ट करून कोणकोणत्या क्षेत्रामध्ये एम बी अे च्यासंधीइतर क्षेत्रापेक्षा अधिक आहेत हे स्पष्ट केले.महाविदयालयाच्या शेवटच्या वर्षामध्ये असताना एम बी अे चीतयारी कशाप्रकारे करतायेईलत्यासंदर्भात असणारीप्रवेशपरिक्षा कधी असते वत्याचा अभ्यासक्रम कशाप्रकारचा असतो हे त्यानी स्पष्ट केले. प्रवेशपरिक्षा २०० गुणांची असते त्यामध्ये जनरलनॉलेज, गणित, इग्रंजी, तर्कशास्त्र इत्यादीचासमावेश असतो.त्याचीतयारी करताना कोणकोणत्यापुस्तकांचा अभ्यास करावावसराव कसा करावा, एम बी अे मध्ये जे विविधविशेषीकरण असते त्यामध्ये प्रामुख्याने विपणन, उत्पादन, वित्त, मनुष्यबळयाचीनिवड करतानाविदयार्थ्यांची आवडनिवडवभविष्यातीलत्यातील असणा-यासंधीयाचे सविस्तरविवेचन केले.विशेषीकरणनिवडतानामुलीनामनुष्यबळामध्ये योग्यसंधी कशी उपलब्ध आहे हे विविध उदाहरणाद्वारे स्पष्ट केले. महाविदयालयाचीनिवड करतानात्याचीमान्यता, भौतिकसुविधा, प्लेसमेंटची सुविधा कशाप्रकारे दिल्या जाातात हे पाहावे.

पारंपारिकव्यवस्थापन करण्याऐवजी डिजिटल एम बी अे चापर्यायविदयार्थ्यानीलक्षात घ्यावा असे आवाहनत्यानी केले.सध्याप्रत्येक क्षेत्रात अगदी उत्पादनापासूनते विपणनापर्यंतव ग्रामपातळीपासूनते कें द्र सरकारपर्यंतप्रत्येक ठिकाणी डिजिटलचा वापर केला जात आहे. तसेच सरकारीपातळीवरत्याला अधिकप्रोत्साहनदिले जात आहे.त्याचबरोबरई कॉमर्स देखीलमोठयाप्रमाणातवाढत असून डिजिटल हा घटक महत्वाचा ठरतो.विदयार्थ्यांनी डिजिटल एम बी अे केल्यास करिअरसाठीमोठी संधी उपलब्धहोवूशकते. त्यामुळे आगामीयुग डिजिटल आहे हे लक्षात घेवून योग्यपर्यायनिवडावा असे आवाहनत्यानी केले.महाविदयालयाचे प्राचार्यडॉ ठोंबरे वाय के यानी आपल्यामनोगतामध्ये एम बी अे चे महत्वविदयार्थ्याना पटवून दिले.महाविदयालयात असतानात्याचीतयारी करावी की जेणेकरून करिअर अधिक चांगले होवूशकते हे स्पष्ट केले.कार्यक्रमाचासमारोप कु.**श्रध्दा पालकर**हिने केला. या कार्यक्रमालावाणिज्यविभागप्रमुखप्रा. खोत एस एसवप्रा गजभिये लंकेश उपस्थितहोते.


N.E.S. & Jr. College, Patpanhale
Tal.Guhagar, Dist.Ratnagiri
COMMERCE ASSOCIATION
Managing Committee


N.E.S. & Jr. College, Patpanhale
Tal.Guhagar, Dist.Ratnagiri
COMMERCE ASSOCIATION
Managing Committee

